| | |
|---|---|
| **विभाग प्रमुख** | श्री. संभाजी पानपट्टे |
| **दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** | ७७३८३१४७७७ |
| **ई- मेल** | animalhusbandary@mbmc.gov.in |

- महानगरपालिका क्षेत्रात मोकाट फिरणारी जनावरे महापालिका कामगारांकडून पकडून त्यांना महानगरपालिकेच्या कोंडवाड्यामध्ये बंदिस्त केले जाते. जर जनावरांचा मालक ७ दिवसांच्या आत जनावरे सोडविणेसाठी आला असता दंडाची रक्कम आकारुन जनावरे त्यांच्या ताब्यात दिली जातात. जर ७ दिवसांचे आत मालक जनावरे ताब्यात घेणेस न आल्यास शासनाची श्री मुबंई जीवदया मंडळी, गोशाळा, वसई, ता-वसई, जि. पालघर या ठिकाणी जनावरे पाठविण्यात येते.
- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग (नवि-२०) यांचे पत्र क्र. ०२००४/प्र.क्र.१२१/नवि/२०, दि.०७/०९/२००४ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग (नवि-२०) यांचे पत्र क्र. १०२००४/प्र.क्र.१२१/नवि/२०, दि.२२/०७/२००९ अन्वये जैन धर्मीयांचे पर्युषण पर्व निमित्त श्रावण वद्य १२ ते भाद्रपद शुध्द ४ या दोन दिवशी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कत्तलखाने व मांसविक्रीची सुकाने बंद ठेवण्यास तसेच पर्युषण पर्वातील उर्वरीत दिवशी श्रावण वद्य १३ ते भाद्रपद शुध्द ३ व ५ या दोन दिवशी सर्व कत्तलखाने व मांसविक्रीच्या दुकानदारांना, कत्तलखाने व मांसविक्रीची दुकाने बंद करणेबाबत महानगरपालिकेमार्फत आवाहान केले जाते.
- शासन आदेश क्र. संकीर्ण १०/२००२/प्र.क्र.१११/नवि. २७, नगरविकास विभाग, दि.२८/०३/२००३ अन्वये दरवर्षी “महावीर जयंती” या दिवशी महानगरपालिका क्षेत्रातील कत्तलखाने व मांसविक्री दुकाने बंद ठेवण्याची कार्यवाही केली जाते.
- शासन (गृह विभाग) परिपत्रक क्र. : डिआयएस०९१३/प्र.क्र.४३४/विशा१(ब), दि.०१/१०/२०१४ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३३१ मधील तरतुदी अन्वये दर वर्षी बकरी ईदनिमित्त महानगरपालिका क्षेत्रात बकरी मंडी उभारण्यास व जनावरांच्या कुर्बानीसाठी तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दिली जाते. बकरी ईदनिमित्त जनावरांची कत्तलपूर्व तपासणी करीता मा. जिल्हा पशुसंवर्धन उप-आयुक्त, ठाणे (कार्यालय – मुलुंड (प.)) या कार्यालयाकडून पशूधन विकास अधिकारी तथा सक्षम अधिकारी यांची नेमणूक केली जाते.

## विभागाची कामे

**पशुसंवर्धन विभागातील कामकाज ज्या अधिनियम/ नियम मधील तरतुदी अन्वये करण्यात येते, त्या तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील कलम ३३१, ३३२, ३३३, ३३४, ३३५, ३३६, ३३७, ३३८, ३३९ अन्वये.
- प्राणी कलेश प्रतिबंधक कायदा १९६०.
- महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा (सुधारणा) कायदा, १९९५.
- प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१.

| अधिकारी / कर्मचा-यांचे नाव | पदनाम | सोपविण्यात आलेले काम |
|---|---|---|
| श्री. संभाजी पानपट्टे | उप-आयुक्त पशुसंवर्धन | 1. पशुसंवर्धन विभागास नेमून दिलेल्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे.<br>2. शुसंवर्धन विभागाच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवणे.<br>3. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये पशुसंवर्धन विभागाचे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून कामकाज करणे.<br>4. मा. आयुक्त यांनी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करणे. |
| श्री. नरेंद्र चव्हाण | विभागप्रमुख | 1. शहरातील मोकाट कुत्रे पकडून निर्बिजीकरण करुन लसीकरण करणे, यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे ठेकेदाराची नियुक्ती करणे.<br>2. जैन धर्मियांचे पर्युषण पर्वानिमित्त श्रावण वद्य १२ ते भाद्रपद शुध्द ४ या दोन दिवशी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कत्तलखाने व मांसविक्रीची दुकाने बंद ठेवणेबाबतची कार्यवाही करणे.<br>3. दरवर्षी “महावीर जयंती” या दिवशी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कत्तलखाने व मांसविक्रीची दुकाने बंद ठेवण्याची कार्यवाही करणे.<br>4. दर वर्षी बकरी ईदनिमित्त महानगरपालिका क्षेत्रात बकरा मंडी उभारण्यास व जनावरांच्या कुर्बानीसाठी तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देणेची कार्यवाही करणे.<br>5. शहरातील मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यामध्ये बंदिस्त करण्याची कार्यवाही करणे.<br>6. पशुसंवर्धन विभागाचे जनमाहिती अधिकारी म्हणून कामकाज पाहणे.<br>7. मा. आयुक्त व मा. उप-आयुक्त यांनी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करणे. |

| अधिकारी / कर्मचा-यांचे नाव | पदनाम | सोपविण्यात आलेले काम |
|---|---|---|
| श्री. शाम इंगोले | लिपिक | 1. विभागाचे कार्यालयीन दैनंदिन पत्रव्यवहाराचे कामकाज पाहणे.<br>2. शहरातील भटके / पिसाळलेल्या कुत्र्यासंबंधी तसेच मोकाट जनावरांसंबंधी येणा-या तक्रारीवर कारवाई करणे.<br>3. मोकाट जनावरे बंदिस्त करुन जनावर मालकाकडून दंडात्मक कारवाई करणे.<br>4. निविदा प्रक्रियेचे कामकाज करणे.<br>5. वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसा कामकाज करणे.<br>6. पशुसंवर्धन विभागाचे सहा. जन माहिती अधिकारी म्हणून कामकाज पाहणे. |
| श्री. विवेक पाटील | शिपाई | 1. कार्यालयीन पत्रव्यवहार वाटप करणे.<br>2. कार्यालयीन पत्रव्यवहार, नस्ती सुस्थितीत ठेवणे.<br>3. वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करणे. |
| श्री. भरत गायकवाड | कोंडवाडा मुकादम | 1. मिरा भाईंदर शहरातील रोडवरील मोकाट जनावरे पकडून त्यांना महानगरपालिकेच्या कोंडवाड्यात बंदिस्त करणे.<br>2. बंदिस्त केलेल्या जनावरांना चारा-पाणी देणे.<br>3. बंदिस्त केलेल्या जनावरांच्या मालकाने दंड भरल्यानंतर त्यांना जनावरे ताब्यात देणे.<br>4. वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करणे |
| श्री. मुरगन जेविरन | स.का. | |
| श्री. तावडा नाटा | स.का. | |
| श्री. विल्सन आबेल | स.का. | |
| श्री. रामलिंगम कद्रवेल | स.का. | |
| श्री. पेरीनायगम आशिर्वादम | स.का. | |
| श्री. रमण सोलंकी | स.का. | |

**अंदाजपत्रक**

**सन २०१६ - १७ या मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पशुसंवर्धन विभागासाठी उपलब्ध तरतुदीचा तपशील खालीलप्रमाणे -**

| अनु. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव |
|---|---|
| १. | ब) आरोग्य व सोयी –<br>३) लस टोचणी – ४) मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त / निर्बिजीकरण |
| २. | ब) आरोग्य व सोयी –<br>६) बाजारपेठा / कत्तलखाने आणि कोंडवाडे – २) जनावरांचे खाद्य |